महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३२६ वा | दिनांक : ०९/११/२०२५ | वार : रविवार

# स्थानिक स्वराज्य निवडणुकांत व्हीव्हीपॅटचा मुद्दा न्यायालयात

**मुंबई :** राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर आता न्यायालयीन निर्णयाचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ईव्हीएम यंत्रणेसोबत व्हीव्हीपॅट बसविण्याची मागणी करणाऱ्या काँग्रेस नेते प्रफुल्ल गुडधे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. न्यायालयाने आयोगाला १८ नोव्हेंबरपर्यंत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे निवडणुकीपूर्वीच मतदान प्रक्रियेबाबतचा हा वाद तापण्याची शक्यता आहे.

राज्य निवडणूक आयोगाने नुकताच निर्णय घेतला होता की, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत व्हीव्हीपॅट यंत्रांचा वापर केला जाणार नाही. या निर्णयाला आव्हान देत प्रफुल्ल गुडधे यांनी याचिका दाखल केली. त्यांच्या याचिकेत म्हटलं आहे की, मतदाराला स्वतःचं मत कोणत्या उमेदवाराला दिलं गेलं हे व्हीव्हीपॅटद्वारे स्पष्ट दिसतं, त्यामुळे ही यंत्रणा पारदर्शकतेसाठी आवश्यक आहे. जर व्हीव्हीपॅट वापरणं शक्य नसेल, तर आयोगाने मतपत्रिकांद्वारे मतदान घेण्याचा पर्याय स्वीकारावा, अशीही मागणी त्यांनी केली आहे. यावर सुनावणी करताना न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या खंडपीठाने आयोगाकडून स्पष्टीकरण मागवले आहे.

दरम्यान, न्यायालयाने स्पष्ट केलं आहे की निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि मतदारांचा विश्वास अबाधित ठेवणं अत्यावश्यक आहे. त्यामुळे आयोगाने घेतलेल्या निर्णयामागील कारणे न्यायालयासमोर मांडावी लागतील. याचिकाकर्त्यांनी सांगितले आहे की, व्हीव्हीपॅट यंत्रणेमुळे मतदारांचा विश्वास वाढतो, कारण त्यांना त्यांच्या मताची नोंद योग्य उमेदवाराकडे गेल्याचं प्रत्यक्ष दिसून येतं. देशातील संसदीय आणि विधानसभा निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅटचा वापर होत असताना, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मात्र तो वापरला जात नाही, हे योग्य नाही, असेही गुडधे यांनी न्यायालयासमोर मांडले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून, २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. २४६ नगरपालिका आणि १८ नगरपंचायतींसाठी निवडणुका पार पडणार आहेत. ३ डिसेंबर रोजी निकाल जाहीर होईल. दरम्यान, उमेदवारांच्या अर्ज भरण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर, न्यायालयाने दिलेल्या नोटिशीमुळे निवडणूक आयोगावर दडपण वाढलं आहे. आयोग आता व्हीव्हीपॅटच्या वापराबाबत कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणामुळे निवडणुकीपूर्वी राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे. काँग्रेसने या मुद्द्यावर सरकार आणि निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे, तर आयोगाकडून तांत्रिक आणि व्यवस्थापकीय कारणे देत व्हीव्हीपॅट न वापरण्याचा निर्णय योग्य असल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, न्यायालयात १८ नोव्हेंबरपर्यंत आयोगाने दिलेलं उत्तरच या प्रश्नावर अंतिम दिशानिर्देश देईल. व्हीव्हीपॅटचा वापर होणार का किंवा मतदान मतपत्रिकांद्वारेच घ्यावं लागेल का, याचा निर्णय आगामी काही दिवसांत स्पष्ट होईल आणि त्यावरच राज्यातील स्थानिक स्वराज्य निवडणुकांचा पुढील मार्ग अवलंबून असेल.

# मनोज जरांगेंना मुंबई पोलिसांचे समन्स



**मुंबई :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या अडचणी वाढल्या असून, मुंबईतील आझाद मैदान पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी हजर राहण्याबाबत नोटीस बजावली आहे. जरांगे पाटील यांना येत्या १० तारखेला (नोव्हेंबर) चौकशीसाठी आझाद मैदान पोलिस ठाण्यात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पोलिसांनी ही नोटीस जरांगे पाटील यांच्यासह त्यांचे सहकारी विरेंद्र पवार यांना देखील पाठवली आहे.

काही महिन्यांपूर्वी मुंबईतील आझाद मैदानात मनोज जरांगे पाटलांनी मराठा आरक्षणासाठी आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे सध्या जरांगे पाटील अडचणीत आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे समन्स जरांगे पाटील यांनी आझाद मैदानात केलेल्या उपोषणादरम्यान झालेल्या कथित उल्लंघनांशी संबंधित आहेत. मनोज जरांगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर आझाद मैदानावरील आंदोलनादरम्यान पोलिसांनी घालून दिलेल्या नियम आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे.

या आंदोलनासाठी कोणतेही अधिकृत परवानगी न घेतल्याचा आरोप करत पोलिसांनी आझाद मैदान पोलिस ठाण्यात मनोज जरांगे पाटील आणि इतर सहकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला होता. या पार्श्वभूमीवर आता पोलिसांनी समन्समध्ये मनोज जरांगे-पाटील आणि इतर पाच जणांना १० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेच्या दरम्यान आझाद मैदान पोलिस स्टेशनमधील तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले.

# उद्धव, राज ठाकरेंमध्ये सत्तेत येण्याची क्षमता नाही : नारायण राणेंची खोचक टीका



**सिंधुदुर्ग :** भाजप नेते आणि माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी शिवसेना नेते उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. दोघं भाऊ आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी एकत्र बोलत आहेत. पण सत्तेवर येण्याची ताकद त्यांच्यात नाही, असा टोला राणेंनी लगावला. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यासाठी काहीच केलं नाही, त्यांचं अस्तित्व संपत चाललंय आणि आता त्यांच्या हाती फक्त भाषणे उरली आहेत, अशी टीका करत राणेंनी ठाकरे बंधूंवर निशाणा साधला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकीय समीकरणं पुन्हा एकदा बदलण्याच्या मार्गावर दिसत आहेत. कणकवली नगरपंचायतीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे दोन्ही गट, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गट आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील गट, एकत्र येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शहर विकास आघाडी या नावाने दोन्ही गट मिळून ही निवडणूक लढवू शकतात, अशी चर्चा रंगत आहे. नुकतीच कणकवलीत झालेल्या गुप्त बैठकीमुळे या चर्चांना अधिक जोर आला आहे. या बैठकीत माजी आमदार वैभव नाईक, माजी आमदार राजन तेली, तसेच स्थानिक नेते सुशांत नाईक, संदेश पारकर आणि सतीश सावंत उपस्थित होते. नगरपंचायतीसाठी संभाव्य आघाडी आणि उमेदवार निवड यावर प्राथमिक चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

या चर्चेच्या पार्श्वभूमीवर भाजप नेते आणि माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी शिवसेना शिंदे गटाला थेट इशारा दिला आहे. सिंधुदुर्गमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना राणे म्हणाले की, जर शिंदे गटाने ठाकरे गटाशी हातमिळवणी केली, तर आम्ही रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिंदे गटाशी सर्व संबंध तोडू. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, विशाल परब आणि राजन तेली मला मनापासून मान्य नाहीत. मी त्यांचा नेहमी विरोध करीन. राणेंनी यावेळी एकनाथ शिंदे यांनाही लक्ष्य केले आणि ज्यांना सगळ्यांनी टाकून दिलं, त्यांना शिंदे का गोळा करतोय? असा थेट प्रश्न उपस्थित केला. तसेच त्यांनी पुढे इशारा देत म्हटलं की, विशाल परब मला भेटला तर ब्रेकिंग न्यूज मिळेल, अशा शब्दांत त्यांनी अप्रत्यक्ष धमकीच दिली.

राणे यांनी पत्रकार परिषदेत पुढे बोलताना सांगितले की, मी स्वतः युती व्हावी, हेच इच्छितो. मात्र, ती युती कोणासोबत व्हावी, याचाही विचार करावा लागतो. ते म्हणाले की, जिल्ह्यात जागावाटपावर लवकरच निर्णय घेतला जाणार आहे आणि त्यानुसार महायुती उमेदवार निश्चित केले जातील. या वक्तव्यामुळे भाजप आणि शिंदे गटामध्ये सध्या सुरू असलेली मतभिन्नता अधिक स्पष्ट झाल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. राणे यांनी पूर्वीपासूनच आपल्या जिल्ह्यातील राजकीय नियंत्रण कायम ठेवले आहे आणि शिंदे गटाचे स्थानिक नेते त्यांच्या विरोधात उभे राहत असल्याने त्यांचा संताप ओसंडून वाहत असल्याचं दिसतंय.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ नोव्हेंबर २०२५


## एनसीसी विभागा तर्फे वंदे मातरम गीताचा सार्ध शती महोत्सव



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथे 'वंदे मातरम ' आनंदमठ कादंबरी बंकिमचंद्र चटर्जी लिखित गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याबद्दल महाविद्यालयात एनसीसी विभागातर्फे वंदे मातरम गीत गाऊन देशभक्ती, देशप्रेम विद्यार्थ्यांमध्ये जागृत करण्यात आले. यावेळी महाविद्यालयात सर्वप्रथम वंदे मातरम गीत गाण्यात आले त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले सर यांनी कॅडेट्सना या दिवसाचे ऐतिहासिक व वंदे मातरम गिताचा संपूर्ण अर्थ महत्त्व सांगुन मार्गदर्शन केले. सरांनी आपल्या भाषणात आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी या गीताने सर्व देश भक्तांना एक सूत्र ते मध्ये बांधण्याचे काम केले . तसेच हजारो, लाखो भारतीयांनी वंदे मातरम म्हणत ब्रिटिशांच्या गोळ्या आपल्या छातीवर घेतल्या देशासाठी प्राण दिला पण वंदे मातरम म्हणतच. ऐवढे सामर्थ्य , देशप्रेम , शक्ति या गिता मध्ये होते असे सांगितले . आज सुद्धा हे गित कालजयी आहे त्यासाठी संपूर्ण भारतीयांनी भारत मातेला वंदे मातरम म्हणजेच मातृभूमिला वंदन करणे होय व आजच्या काळात सर्वांमध्ये देशप्रेम , देशभक्ति जागृत होणे महत्वाचे आहे असे सरांनी सांगितले . नंतर दिडशे वर्ष पूर्ण झाल्या बदल चित्रकला स्पर्धा घेण्यात आली होती चित्रकलेचा विषय होता २०४७ मध्ये भारत कसा असेल? या स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला . प्रथम क्रमांक पंकज जमादार , द्वितीय किरण सास्तुरे , तृतीय साक्षी राजपुत , सुलोचना सुर्यवंशी .या वेळी मंचावर उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, डॉ पदमाकर पिटले होते सुत्रसंचलन ,प्रास्ताविक कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले व आभार कॅडेट सुशांत जाधव यांनी मानले. यावेळी सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी , कॅडेटस या कार्यक्रमासाठी उपस्थित होते .

## इकरा पब्लिक शाळेत शुगर बोर्डाची स्थापना



**इकरानगर मोहाडी (प्रतिनिधी) :** शाळांमधील मुलां मुली मध्ये वाढणाऱ्या मधुमेहाच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शिक्षण मंडळाने सर्व शाळांमध्ये 'शुगर बोर्ड' लावण्याचा निर्णय घेतला आहे त्याची अंमलबजावणी इकरा पब्लिक शाळेत करण्यात आली. इकरा शिक्षण संस्था चे सचिव एजाज मलिक यांच्या हस्ते मुलींनी तयार केलेल्या शुगर बोर्ड पोस्टर्स चे उद्घाटन करण्यात आले.लहान वयातच मुलांमध्ये मधुमेहाच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असल्याचे चिंताजनक चित्र समोर आले आहे.वाढत्या साखर सेवनामुळे लठ्ठपणा, अल्पवयीन मधुमेह, तसेच इतर अनेक आरोग्यविषयक समस्यांचे प्रमाण वाढले आहे.याच पार्श्वभूमीवर इकरा शिक्षण संस्था चे अध्यक्ष डॉ.करीम सालार यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, इकरा शिक्षण संस्था अंतर्गत सर्व शाळांमध्ये ‘शुगर बोर्ड’ लावण्याचे निर्देश दिले आहेत.या उपक्रमाचा उद्देश मुलांमध्ये साखरेच्या अति सेवनाचे दुष्परिणाम जाणवून देणे आणि आरोग्यदायी जीवनशैलीकडे वळविणे हा आहे.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903


## डॉ. प्रभाकर शेळके यांचा ‘साहित्य ज्ञानरत्न’ पुरस्काराने केला सन्मान




**जालना :** जालना येथील कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांना संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज जन्मस्थान श्रीक्षेत्र आपेगाव (ता पैठण) आयोजित संत ज्ञानोबाराय द्वितीय राज्यस्तरीय साहित्य संमेलनात "साहित्य ज्ञानरत्न"पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या संमेलनाच्या उद्घघाटिका ख्यातनाम कवयित्री डॉ उर्मिला चाकुरकर संमेलनाध्यक्ष हास्यकवी संजय कावरे, स्वागताध्यक्ष अध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर संयोजक संदिप राक्षे हास्य कवी ज्ञानेश शिळवणे,अलका बोर्डे, हास्य कवी विजय पोहनेरकर,कवी संतोष तांबे निवेदक प्रा.रवींद्र मगर आदी मान्यवरांच्या हस्ते डॉ शेळके यांनी मराठी भाषा साहित्य संस्कृती संतसाहित्य परंपरेच्या जोपासनेसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्य बदल त्यांना सन्मानित करण्यात आले.असे संयोजकांनी सांगितले याप्रसंगी राज्यभरातील साहित्यिक संजय गोराडे, रवींद्र मालुंजकर,बबन धुमाळ, प्रशांत केंधळे,राजेंद्र उगले विशाल टर्ले,सागर जाधव, कवयित्री नीशा कापडे,स्नेहल येवला यांनी सुत्रसंचलन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ नोव्हेंबर २०२५

## अंजना स्कूल ऑफ एक्सीलन्स शाळेच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेमध्ये मिळवले घवघवीत यश



**दौलताबाद (जावेद अहमद) :** क्रीडा युवा संचालक महाराष्ट्र राज्य पुणे परभणी मानवत येथे आयोजित विभागीय स्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये अंजना स्कूल ऑफ एक्सीलन्स, शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे.शाळेचे विद्यार्थी वेदांत ज्ञानेश्वर जगदाळे यांने हातोडा फेक स्पर्धेमध्ये संपूर्ण मराठवाड्यामध्ये पहिला क्रमांक मिळवला, तर पृथ्वीराज मोतीलाल राजपूत यांनी भाला फेक स्पर्धे मध्ये दुसरा क्रमांक पटकावला. या उत्कृष्ट प्रदर्शनामुळे दोन्ही विद्यार्थी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे संस्थापक अध्यक्ष शंकर पल्हाळ,अध्यक्षा स्मिता पल्हाळ, उपाध्यक्षा मोनिका पल्हाळ, संचालक स्वर्णजित पल्हाळ, मुख्याध्यापिका स्नेहा पवार, देव साठे, क्रीडा शिक्षक आकाश इंगळे यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन साजरा करणे म्हणजे विद्यार्थ्यांना दिशा - डॉ. लक्ष्मण दांडगे




**करमाड :** राजीव गांधी महाविद्यालय, करमाड येथे ७ नोव्हेंबर हा दिन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन म्हणून मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ लक्ष्मण दांडगे यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शाळेत प्रवेश घेतला तेव्हा या देशातील समाजव्यवस्था वर्ण व्यवस्थेचा पुरस्कार करणारी होती. त्यामुळे अस्पृश्य समाजातील मुलांना शिक्षणाची दारे बंद होती परंतु इंग्रजी राजवट असल्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांना शाळा प्रवेश मिळणे सोपे झाले, पुढे त्यांनी बुद्ध, कबीर, फुले यांच्या विचाराचा वारसा घेऊन त्यांनी संधीचे सोने केले. शालेय प्रवेशासाठी व शिक्षणात अस्पृश्य म्हणुन येणाऱ्या अडचणी त्या सर्व अडचणीवर मात करुन बाबासाहेबानी प्रकांड पंडीत म्हणुन आपला नावलौकिक मिळविला.या देशाचे सर्वधर्म समभाव असे संविधान निर्माण केले,वर्ण व्यवस्थेमुळे शाळा प्रवेश मिळताना अनंत अडचणीना तोंड देऊन जगातील प्रकांड पंडित बनलेले डॉ. बाबासाहेब जगातील सर्व विद्यार्थ्यांचे आदर्श ठरले असे विचार त्यांनी मांडले.

यावेळी बकीमचंद्र लिखित ७ नोव्हेंबर २०२५रोजी वंदे मातरम गीताला दीडशे वर्ष झाली म्हणून "वंदे मातरम सार्थ शताब्दी" दिन साजरा करण्यात आला."वंदे मातरम " या गीताचे सामूहिक गायन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.एस.मुळे होते. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनएसएस चे कार्यक्रमाधिकारी डॉ. कालिदास फड यांनी केले, यावेळी महाविद्यालयातील मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. आश्विणकुमार चिंचोलीकर, डॉ. पोटदुखे,डॉ. किशोर काळे,डॉ. नितीन मुळे, डॉ. ललित गोल्डे, डॉ. लावंड, प्रा. माठे, डॉ. कचरे, डॉ. पठाण, डॉ. लावंड, डॉ.सौरभ चव्हान, डॉ. अमित राऊत, प्रा. होळकर, प्रा.खरात, प्रा.तन्मय भावसार, प्रा.चव्हाण, प्रा.कु-हाडे, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. मुक्तापुरे, श्री.साळवे, श्री. देशपांडे, श्री. प्रसन्न वैद्य इत्यादी कर्मचारी आणि विद्यार्थी ऊपस्थित होते.

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ नोव्हेंबर २०२५


## तायक्वांदो स्पर्धेत ईश्वरीने सुवर्ण पदक तर समीक्षाने कांस्य पदक पटकावले







**दौलताबाद (जावेद अहमद) :** वंजारवाडी येथील गरुडझेप करिअर अकॅडमीचा राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत विद्यार्थ्यांनीने सुवर्ण पदके जिंकलेगरुडझेप करिअर अकॅडमीच्या विद्यार्थिनींनी इंटर स्कूल राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धा २०२५ मध्ये अभूतपूर्व कामगिरी करत पदके जिंकलीया स्पर्धेचे आयोजन १३ ते १६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान विभागीय क्रीडा संकुल छत्रपती संभाजी नगर येथे पार पडली.राष्ट्रीय खेळाडू ईश्वरी निलेश सोनवणे हिने वयोगट: अंडर-१९ (अंडर-५२ किलो वजन गट) मध्ये सुवर्ण पदक पटकावले यासाठी तिची निवड इंटर स्कूल नॅशनल तायक्वांदो स्पर्धा २०२५ साठी झाली आहे ही स्पर्धा नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात जम्मू आणि काश्मीर येथे होणार आहेतसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू समीक्षा सुरेश सोनवणे वयोगट: अंडर-१४ (अंडर-३५ किलो वजन गट कांस्य पदक जिंकले आहेया दोन्ही खेळाडूं मुलींचे संचालक डॉ. सुरेश सोनवणे प्रा. निलेश सोनवणे, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देशाई, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे प्रसाद कुलकर्णी, मुख्याध्यापिका सवित्री डकरे , मीरा देशपांडे, प्रशिक्षक संतोष बस्नेत, दीपक भोर आणि शिक्षकवर्ग यांनी ईश्वरी आणि समीक्षा यांचे अभिनंदन केले आहे


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## मी आलोय सोडून कविता

मी आलोय
सोडून कविता इंद्रायणीत
गाथेला भेटण्यासाठी.

पण सोडू शकलो नाही अजूनही
ती वही..उसनवारीची अन् कर्जाची
कर्ज फेडायचं बाकी राहिलंय
म्हणून..

खूप चिकटलोय मी
या मोहाच्या काळोख्या जगाला
जणू आकाशालाच
जखडून ठेवलंय चांदण्यांनी
बळजबरीनं... तसं..

अजून बरंच बाकी आहे सोडायचं..
मोह माया तृष्णेबरोबर
डोळ्यांना भुलावणारं हे जग..

केलाय प्रयत्न मी,
बा तुकोबा सारखा
सगळं सोडून देण्याचा..
पण सुटत नाही अजूनही
बरंचसं..
आयुष्याचा भंडारा झाला तरी..


**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
94033 84889


## चहा

सर्वांचा आवडता
मी म्हणजे चहा
चव माझी गोड
घेऊन तर पहा

लहान मोठ्यांचा
प्रिय मी भारी
पोटात गेल्यावर
येते तरतरी

पाहुणे येता घरी
होते माझी तयारी
गुणगाण गातात
पाहुणे मंडळी सारी

न होणारी कामं
होतात माझ्यामुळे
अनोळखी माणसासंगे
मैत्रीचे नाते जुळे

कप आणि बशी
माझे जवळचे दोस्त
घोट घेत सर्व म्हणतात
चहा झाला मस्त




**- रविंद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०९ नोव्हेंबर २०२५

# स्वातंत्र्याची जाणीव, संघर्ष आणि जबाबदारी : जागतिक स्वातंत्र्य दिनाचे समाजशास्त्रीय चिंतन

मानवजातीच्या इतिहासातील सर्वात मूलभूत आणि आधारभूत मूल्य जर कोणते असेल, तर ते म्हणजे स्वातंत्र्य होय. मनुष्य जन्मतः स्वतंत्र असतो, त्याला विचार करण्याचा, जगण्याचा, निर्णय घेण्याचा अधिकार जन्मापासूनच प्राप्त असतो. परंतु इतिहासाच्या विविध टप्प्यांत हे स्वातंत्र्य अनेकदा हिरावले गेले, त्याला बंधनांत अडकविण्यात आले, त्याच्या मनावर, शरीरावर आणि जीवनावर बाह्य शक्तींचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात आले. कधी वसाहतवादाच्या रूपाने, कधी गुलामगिरीच्या रूपाने, कधी हुकूमशाहीच्या राजकीय व्यवस्थेद्वारे, तर कधी समाजातील विषमता, जात, धर्म, लिंग आणि वर्ग यांच्या नावावर व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्यात आले. म्हणूनच 9 नोव्हेंबर रोजी साजरा होणारा ‘जागतिक स्वातंत्र्य दिन’ हा दिवस केवळ एका ऐतिहासिक आठवणीचा दिवस नसून स्वातंत्र्याच्या संघर्षाला, त्याच्या मूल्यांना आणि त्याच्या रक्षणाच्या सततच्या बांधिलकीला पुनर्स्मरण करण्याचा दिवस आहे.स्वातंत्र्य ही केवळ राजकीय संकल्पना नाही, ती सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक, मानसशास्त्रीय आणि आर्थिक स्तरावर पसरलेली एक बहुआयामी मूल्यव्यवस्था आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीला स्वतःच्या अस्तित्वाचे आणि ओळखीचे भान देणारी प्रक्रिया होय. मनुष्य समाजात जगतो, त्यामुळे त्याचे स्वातंत्र्य हे वैयक्तिक असले तरी त्याचे परिणाम सामूहिक असतात. स्वातंत्र्य म्हणजे बंधनांचा अभाव एवढाच मर्यादित अर्थ नसून, स्वातंत्र्य म्हणजे न्याय्य, सुरक्षित, समान आणि मानवी प्रतिष्ठेने जगण्याचा हक्क होय. स्वातंत्र्य म्हणजे समाजातील सर्व व्यक्तींना संधींची समानता आणि योग्य साधनसंपत्ती उपलब्ध करून देणारी सामाजिक व्यवस्था होय. व्यक्तीच्या स्वातंत्र्याबरोबरच समाजाच्या विकासाच्या प्रक्रिया एकमेकांशी अभेद्यरीत्या जोडलेल्या आहेत.मानवजातीने स्वातंत्र्यासाठी असंख्य संघर्ष केले आहेत. इतिहासातील प्राचीन साम्राज्यांनी लोकांना गुलाम केले, गोऱ्या वंशाने काळ्या वंशाच्या लोकांवर आपले वर्चस्व गाजविले, साम्राज्यशाही शक्तींनी आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका या प्रदेशांना वसाहतवादाच्या जाळ्यात अडकविले, धर्मांच्या किंवा शासनाच्या नावावर विचार आणि अभिव्यक्तीवर बंदी घालण्यात आली. या सर्व परिस्थितींना मनुष्याने आव्हान देत स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी चळवळी उभ्या केल्या. भारताची स्वातंत्र्य चळवळ ही जगातील सर्वात महत्त्वाच्या आणि अनुकरणीय संघर्षांपैकी एक ठरली. महात्मा गांधी, नेहरू, भगतसिंग, सुभाषचंद्र बोस, सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू, राजर्षी शाहू महाराज यांसारख्या असंख्य नेत्यांनी स्वातंत्र्याची व्याख्या फक्त परकीय शासनाच्या समाप्तीपर्यंत मर्यादित ठेवली नाही; त्यांनी स्वातंत्र्याला सामाजिक समानता, शैक्षणिक हक्क, आर्थिक न्याय, लिंग-समानता, जात-व्यवस्था निर्मूलन आणि मानवी प्रतिष्ठा यांसोबत जोडले.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली ‘स्वातंत्र्य - समता - बंधुता’ ही त्रिसूत्री मानवी स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे सर्वोच्च तात्त्विक परिमाण आहे. त्याच्या आधारे भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, श्रद्धास्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेने जगण्याचा हक्क दिला आहे. परंतु समाजातील जातीय असमानता, पितृसत्ता, धार्मिक कट्टरता, संपत्तीचे असमान वाटप, ग्रामीण-शहरी दरी, गरीबी, निरक्षरता, बेरोजगारी, डिजिटल विभाजन, माध्यमांच्या एकाधिकारशाही आणि राजकीय ध्रुवीकरण यांसारख्या घटकांमुळे स्वातंत्र्य आजही अनेकांच्या आयुष्यात अपूर्ण, असमान आणि अधुरेच आहे.आज ‘स्वातंत्र्य’ याची पुनर्व्याख्या करण्याची गरज आहे. आज व्यक्तीला राजकीयदृष्ट्या मतदानाचा हक्क आहे, अभिव्यक्तीची स्वायत्तता संविधानाने दिली आहे, परंतु डिजिटल युगात अभिव्यक्तीवर असलेल्या छुप्या नियंत्रणाचा, इंटरनेटवरील माहितीच्या गोंधळाचा, खोट्या प्रचाराचा, ट्रोल संस्कृतीचा, आणि विचारांवर होत असलेल्या मानसिक वर्चस्वाचा प्रश्न अधिक गंभीर स्वरूपात समोर आहे. हे बंधन अदृश्य आहे, भिंत दिसत नाही, परंतु मन आणि विचार कैद होतात.आजही स्वतंत्र आणि लोकशाही राष्ट्रांमध्ये दिसणाऱ्या अनेक असमानता दर्शवितात की स्वातंत्र्य हा अंतिम ध्येय प्राप्तीचा टप्पा नसून तो सतत जपण्याचा आणि विस्तारित करण्याचा संघर्ष आहे. संविधानाने दिलेले अधिकार असले तरी समाजाची मानसिकता जर संकुचित, भेदभावपूर्ण आणि वर्चस्ववादी असेल तर हे स्वातंत्र्य केवळ कागदावरच राहते. उदा. व्यक्तीला विचारस्वातंत्र्य आहे, पण त्याच्या विचारावर हिंसेची प्रतिक्रिया झाली तर ते स्वातंत्र्य धोक्यात येते. महिलांना शिक्षण आणि कामाचा अधिकार आहे, परंतु पितृसत्ताक नियंत्रणामुळे त्यांच्या निर्णयस्वातंत्र्यावर बंधने येतात. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक समुदायांना कायदेशीर समानता आहे, पण सामाजिक स्तरावर अजूनही त्यांना भेदभाव, बहिष्कार आणि शोषणाचा सामना करावा लागतो. म्हणूनच स्वातंत्र्याचे खरे मूल्य व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात आणि समाजाच्या वर्तनात कसे प्रतिबिंबित होते, यावर अवलंबून आहे.आजच्या जागतिक जगतात स्वातंत्र्याच्या संकल्पनेसमोर नव्या आव्हानांची मालिका उभी राहिली आहे. तंत्रज्ञानाने संवाद, शिक्षण, अर्थव्यवस्था आणि विचारांची देवाणघेवाण यांना गती दिली आहे, परंतु त्याचवेळी तेच तंत्रज्ञान निगराणी, डेटा-नियंत्रण, माहितीचे अपहरण, भ्रम-जागरूकता, आणि मानसिक गुलामगिरी निर्माण करण्याचे साधन बनत आहे. सोशल मीडिया ही माहिती स्वातंत्र्याची जागा असूनही तेथे द्वेष, फूटपाडणी, कट्टरमतवाद, मिथ्यप्रचार आणि वैयक्तिक विचारांचे नियंत्रण या गोष्टी वाढताना दिसतात. गोपनीयतेचा हक्क आणि सुरक्षिततेची गरज यांच्यातील संघर्ष दिवसेंदिवस गुंतागुंतीचा होत आहे. लोकशाही देशांमधील सत्ताकेंद्रे हळूहळू पुन्हा केंद्रीकृत होत असल्याचे दिसून येते, आणि नागरिकांना अज्ञानातून किंवा प्रचारातून नियंत्रित करण्याच्या पद्धती अधिक सूक्ष्म आणि धोकादायक बनत आहेत.जागतिक स्तरावर आर्थिक असमानता ही स्वातंत्र्याला सर्वात मोठे घाव घालणारी प्रक्रिया आहे. जगातील केवळ काही टक्के लोकांकडे बहुसंख्य संपत्ती केंद्रित झाली आहे, तर मोठा लोकसमूह गरिबी, बेरोजगारी, भूक, कुपोषण आणि संघर्षांच्या सावटाखाली जगत आहे. आर्थिक हक्कांशिवाय स्वातंत्र्य अपूर्ण राहते. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे झाल्यास स्वातंत्र्याची खरी व्याप्ती म्हणजे सामाजिक-आर्थिक संधींची समानता होय. जर एखाद्या व्यक्तीला त्याच्या कर्तृत्वानुसार प्रगती करता येत नसेल, त्याला शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सांस्कृतिक सहभागाच्या संधी मिळत नसतील, तर त्याचे स्वातंत्र्य तुटपुंजे आणि भावनिक स्वरूपाचे ठरते.भारतातील स्वातंत्र्याची सामाजिक प्रकृती समजून घेण्यास सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकशाही होय. लोकशाही ही फक्त निवडणुकांमधील मतदानाची प्रक्रिया नसून, ती नागरिकांचा सहभाग, संवाद, उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि विचार-विनिमय यांची सातत्यपूर्ण सामाजिक साधना आहे. जेव्हा नागरिक जागरूक असतात, तेव्हा स्वातंत्र्य सुरक्षित राहते. पण जेव्हा नागरिक अज्ञान, उदासीनता किंवा भीतीच्या छायेत अडकतात, तेव्हा स्वातंत्र्य कमजोर होऊ लागते. म्हणूनच स्वातंत्र्य टिकवण्यासाठी शिक्षण, विवेक, मानवतावाद आणि सामाजिक जागरूकता या मूल्यांचे संवर्धन अनिवार्य आहे.स्वातंत्र्याचा सर्वात मूलभूत भाग म्हणजे मानवी प्रतिष्ठा होय. कोणत्याही व्यक्तीला त्याच्या वंशामुळे, धर्मामुळे, लिंगामुळे, भाषेमुळे किंवा सामाजिक-आर्थिक स्थितीमुळे कमी लेखले जाऊ नये. समाजात परस्पर आदर, सहिष्णुता, विविधतेची स्वीकृती आणि मानवी मूल्यांवरील विश्वास हे स्वातंत्र्याचे संरक्षण करणारे स्तंभ आहेत. स्वातंत्र्याला प्रेम, करुणा, संवेदनशीलता आणि न्यायाची जोड मिळाली तरच ते मानवी विकासाचे साधन बनते.आजच्या या जागतिक स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आपल्यासमोर सर्वात महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो तो म्हणजे आपण स्वतंत्र आहोत, पण स्वातंत्र्यवादी आहोत का? म्हणजेच, आपण केवळ स्वातंत्र्य उपभोगतो की त्याची जबाबदारीही पार पाडतो? स्वातंत्र्य हे अधिकारांसोबत कर्तव्यांचीही मागणी करते. समाजातील अन्याय, भेदभाव, विषमता, हिंसा आणि दडपशाहीविरुद्ध आवाज उठविणे हीच स्वातंत्र्याची खरी परीक्षा आहे.शेवटी असे म्हणता येईल की स्वातंत्र्य हे मिळवण्याची गोष्ट नसून जपण्याची प्रक्रिया आहे. ते सतत विचारले, तपासले, पुनर्निर्मित केले आणि सामूहिकपणे संरक्षित केले पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे फक्त आपले हक्क नव्हे; तर इतरांच्या हक्कांचा आदर करण्याची जाणिव होय. जागतिक स्वातंत्र्य दिन हा दिवस आपल्याला मानवी मूल्यांची आठवण करून देतो आणि आपल्याला सामाजिक न्याय, सहकार्य, समानता आणि मानवतावादी दृष्टिकोनाची दिशा दाखवतो. स्वतंत्र राष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाने हे स्मरण ठेवले पाहिजे की स्वातंत्र्याचे रक्षण हीच खरी नागरिकधर्माची साधना आहे, आणि ही साधना जिवंत ठेवणे हीच मानवतेची उज्ज्वल बांधिलकी आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
मो. 9960103582,
bagate.rajendra५@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002